TM

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व.इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)
ता.जि.ठाणे-४०१ १०१,दुरध्वनी क्र.०२२-२८१९२८२८, Email :- mbmc.pro2012@gmail.com
जनसंपर्क विभाग

जा.क्र.मनपा/जनसंपर्क/ २३ /२०२२-२३ दि.:- २० / ४ /२०२२

प्रति,

मा.संपादक/जाहिरात व्यवस्थापक
दैनिक/साप्ता. -- सिटी न्यूज मुंबई
----------------------------------------
----------------------------------------

विषय :- वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करणेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयांनुसार आपणांस कळविण्यात येते की, सोबत जोडलेली मिरा भाईंदर महानगरपालिकेची जाहिरात दि. २१ / ४ /२०२२ रोजी वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात यावी.

जाहिरात प्रसिध्दीकरिता सुचना :-

१) सदर जाहिरात हि शासकिय दराप्रमाणे प्रसिध्द करणे, आपणांस बंधनकारक राहील.
२) सदर जाहिरातीत १० फॉन्टपर्यंतच्या साईजच्या व कमीत-कमी जागेचा वापर करुन जाहिरात प्रसिध्द करावी.
३) सदर जाहिरात प्रसिध्द करतेवेळी महानगरपालिकेचा लोगो प्रसिध्द करणे आवश्यक राहील.
४) सदर जाहिरातीत www.mbmc.gov.in या महानगरपालिकेच्या वेबसाईटचा उल्लेख करावा.
५) जाहिरात प्रसिध्द करतेवेळी जनसंपर्क विभागातील जावक क्रमांकाचा उल्लेख करावा.
६) जाहिरातीत छपाई चुक झाल्यास, आपणांस विनामुल्य पुढील अंकांत जाहिरात प्रसिध्द करणे बंधनकारक राहील.
७) जाहिरात प्रसिध्द केलेबाबत वृतपत्राच्या चार प्रती दुस-या दिवशी कार्यालयात सादर करणे आवश्यक राहील.
८) जाहिरात प्रसिध्द केलेले वर्तमान पत्राचे बिल १५ दिवसांत या कार्यालयास सादर करावे.
९) पाठविलेल्या आर.ओ. मध्ये कुठलाही फेरफार करु नये.
१०) पाठविलेला आर.ओ. आपल्याच वृतपत्राच्या नावानिशी पाठविला आहे, याची पुर्ण खात्री करावी व त्यानंतरच वृतपत्रात जाहिरात प्रसिध्द करावी.
११) काही शंका असल्यास जनसंपर्क विभागाशी संपर्क करावा.

वरील सुचनांचे अधीन राहून, काटेकोरपणे पालन करणे आपणांस बंधनकारक राहील.

(राजकुमार घरत)
प्र.जनसंपर्क अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

सोबत :- जाहिरात

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- २०/०४/२०२२

## मा. महासभा

मा. महासभा सुचना क्र. ०१

प्रति,
सन्मा. श्री./श्रीमती ------------------------------
नगरसेवक / नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सूचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगपालिकेची मा. महासभा शुक्रवार दि. २९/०४/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०१ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

मा. महापौर सो. यांच्या मान्यतेने.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

### मा. महासभा शुक्रवार दि. २९/०४/२०२२ सभा सुचना क्र. ०१ विषयपत्रिका

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| — | प्रश्नोत्तरे - |
| — | मागील सभांचे इतिवृत्तांत - |
| ०१ | दि. 01/10/2021, दि. 26/10/2021 (दि. 01/10/2021 रोजीची तहकुब सभा), दि. 26/10/2021, दि. 01/12/2021 व दि. 24/12/2021 (दि. 01/12/2021 रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| — | सर्व निवडणूका - निरंक |
| — | सर्व नियुक्त्या - निरंक |
| — | मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स) - निरंक |
| — | विनंती अर्ज - निरंक |
| — | स्थायी परिवहन व विशेष समित्यांचे ठराव - |
| ०२ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये बालसंरक्षक समित्या स्थापन करणेबाबत. |
| ०३ | महापालिका शाळांमध्ये ९ वी चे वर्ग सुरु करणेबाबत. |
| ०४ | महापालिका शाळांमध्ये सेमी इंग्लिश वर्ग सुरु करणे. |
| ०५ | संपूर्ण मालमत्ता कराचा आगाऊ भरणा केल्यास कर भरणा रक्कमेवर सुट देणेबाबत. |
| ०६ | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीतील मालमत्ता धारकांना इलेक्ट्रीक वाहनांकरीता चार्जिंग स्टेशन उभारणाऱ्या स्थानिक नागरी संस्थेतील नागरीकांना / गृहनिर्माण संस्थांना त्यांच्या मालमत्ता करातून सुट किंवा परतावा देण्याबाबत. |
| ०७ | मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमासाठी नविन इलेक्ट्रीक बस खरेदी करणे व बस सेवेसाठी बस ऑपरेटर नियुक्त करणेकामी धोरणात्मक निर्णय घेणेबाबत. |
| ०८ | मिरारोड (पूर्व) आरक्षण क्र. 230 रामदेव पार्क येथे बांधण्यात आलेले मेडीटेशन सेंटर चा वापर सुरु करणेसाठी भाडे ठरविणेबाबत. |
| ०९ | मिरा भाईंदर शहरासाठी क्लस्टर योजना राबविणेकामी तज्ञ सल्लागार यांची नेमणूक करणेबाबत. |
| १० | राज्यस्तरीय, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्पर्धेत तसेच नोंदणीकृत संस्थेमार्फत (असोसिएशन) मार्फत भरविण्यात येणाऱ्या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना तसेच गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड करणाऱ्या स्पर्धकांना आर्थिक सहाय्य करणेबाबत. |
| ११ | मनपा मुख्य कार्यालय इमारत व सर्व प्रभाग कार्यालय इमारती मधील दैनंदिन साफसफाई कामी हाऊस किपिंग एजन्सी नेमणे कामाची निविदा मागविणेबाबत. |
| १२ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात पावसाळ्यात पडणारे खड्डे Jet Patcher Pothole Patching Machine द्वारे बजविणे कामाबाबत. |
| १३ | रस्ते, चौक, वास्तु यांना नावे देणेबाबत. |
| १४ | मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या प्रवासी तिकीट दर फेररचनेस मंजुरी देणेबाबत. |
| १५ | जेष्ठ विरंगुळा केंद्रातील मासीक अनुदानात वाढ करणे. |
| १६ | महानगरपालिका हद्दीतील बेवारस पशु, पक्षी, जनावरे यांचे दफनासाठी जागा निश्चित करणे. |

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

महानगरपालिका सचिव कार्यालय
मिरा भाईंदर महानगरपालिका
दिनांक :- २० एप्रिल २०२२

जा.क्र. मनपा/नगरसचिव/२३/२०२२-२३
दि. २०/४/२०२२

TM

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे ४०११०१

## नगरसचिव विभाग

जा.क्र. मनपा/सचिव/ ०८ /२०२२-२३ दिनांक :- २० / ४ /२०२२

प्रति,
जनसंपर्क अधिकारी,
मिरा भाईंदर महानगरपालिका.

जनसंपर्क विभाग
आवक क्र. २३
दिनांक २०/०४/२०२२

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महासभेची सुचना प्रसिध्द करणेबाबत.

उपरोक्त विषयानुसार आपणांस कळविण्यात येते की, सोबत जोडलेली मा. महासभेची सुचना दि. 21/04/2022 रोजीच्या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात यावी व सुचना प्रसिध्द केलेल्या वृत्तपत्रांच्या दोन प्रती नगरसचिव कार्यालयाकडे देण्यात याव्यात.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका